**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाला ९ ते ११ ऑगस्ट दरम्यान नॅकची भेट

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मूल्यांकनासाठी नॅक बंगलोर येथील समिती दि. ९ ते ११ ऑगस्ट दरम्यान भेट देणार आहे. विद्यापीठाला तिसऱ्या मूल्यांकनामध्ये ३.०७ म्हणजेच 'ए' मानांकन मिळाले होते. नॅकच्या सात क्रायटेरियानुसार सत्तर टक्के मूल्यमापन सेल्फ स्टडी रिपोर्टमधील माहितीवरुन व तीस टक्के मूल्यमापन प्रत्यक्षरीत्या करण्यात येणार आहे.

नॅक मूल्यांकनाच्यादृष्टीने विद्यापीठाच्या करिक्युलर डेव्हलपमेन्ट, टिचींग, लर्निंग ॲन्ड इव्हॅल्युएशन, रिसर्च, कन्सलटन्सी ॲन्ड एक्सटेन्शन्स, इन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड लर्निंग रिसोर्सेस, स्टुडंट सपोर्ट ॲन्ड प्रोग्रेशन, गव्हर्नन्स, लीडरशीप ॲन्ड मॅनेजमेंट व इन्स्टिट्युशनल व्हॅल्यूज ॲन्ड बेस्ट प्रॅक्टिसेस या सात बाबींवर मूल्यमापन होणार असून त्यामध्ये विद्यापीठाची बाजू सशक्त आहे. ही विद्यापीठासाठी जमेची बाजू असून विद्यापीठास चांगले मानांकन प्राप्त होईल, अशी सर्वांना आशा आहे.

नॅकच्या तयारीच्यादृष्टीने विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय विभागाने जय्यत तयार केली आहे. यासाठी विविध समित्यांचे गठण केले असून त्यांच्या सातत्याने सभा होत आहेत. सभेच्या माध्यमातून तयारी करुन घेतली जात असून त्यादृष्टीने सर्व विभाग तयारीत आहे. याकरिता कुलगुरू डॉ. विलास भाले, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ.एस.एफ.आर. खाद्री, समन्वयक डॉ. अविनाश मोहरील यांसह सर्व संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख तसेच विविध प्राधिकारणींचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०७/०८/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी